**प्रेसनोट** **दिनांक १६/०३/२०१९**

## खडक पोलीस ठाणे,पुणे शहर

### हरविलेल्या ०८ वर्षीय मुलीचा तात्काळ शोध घेऊन, मुलीस पालकांच्या ताब्यात सुखरुप दिले.

दिनांक १५/०३/२०१९ रोजी इसम नामे इशरार शेख, रा. उत्तरप्रदेश हे कुटूंबासह लोहियानगर, पुणे येथील त्यांचे बहीणीचे घरी आले होते. आज दिनांक १६/०३/२०१९ रोजी सकाळी ०८.३० वा. चे सुमारास त्यांची मुलगी नामे शाहिनुर इशरार शेख, वय ०८ वर्षे ही बिस्कीट आणण्यासाठी जवळील दुकानात गेली परंतु बराच वेळ होऊनदेखील मुलगी घरी परत आली नाही. सदर मुलीचा त्यांनी व त्यांचे नातेवाईकांनी लोहियानगर भागात शोध घेतला असता, मुलगी मिळुन न आल्याने, मुलीचे आईने सदर बाब लोहियानगर पोलीस चौकीस येऊन कळविली.

लोहियानगर पोलीस चौकी अंमलदार पो.हवा. २४४७ मिसाळ तसेच लोहिनागर बीट मार्शल कर्मचारी पो.शि. धोत्रे, पो.शि. पांडे यांनी सदर मुलीचा फोटो प्राप्त करुन, सदर मुलगी हरवलेबाबत पुणे शहरामधील सर्व पोलीस ठाणेचे व्हॉट्सअप ग्रुपवर तो पाठविला. सदर मुलगी ही वानवडी पोलीस ठाणेचे हद्दीत मिळुन आलेबाबत माहिती प्राप्त झाली. सदर मुलीस ताब्यात घेणेकामी नमुद बीट मार्शल कर्मचारी व मुलीचे आईवडील यांचेसह वानवडी पोलीस ठाणे येथे गेले. सदर ठिकाणी मुलगी हजर होती. सदर ठिकाणी केलेल्या चौकशीमध्ये ती रस्ता चुकल्याने, सेव्हन लव्हज चौक याठिकाणी आली असता, तेथे एका व्यक्तीने तिला ती रडत असल्याचे पाहुन वानवडी पोलीस ठाणे येथे हजर केल्याचे समजले. सदर मुलीस आईवडीलांच्या ताब्यात सुखरुपपणे देण्यात आले आहे.

ता. १६/०३/२०१९
**(राजेन्द्र मोकाशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर

